## नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००६ मधील निशाणी २५३  वरील आदेश.

(CNR No-MHST-05-000322-2006)

१. प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.९अ गंगुबाई हिंदूराव देवकर हे मयत झाल्यामुळे त्यांच्या नावास काट देवून त्यापुढे कंस करुन मयत हा शब्द लिहून वादींना त्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. वादींनी असे कथन केले आहे की, मयत प्रतिवादी क्र.९अ हिचे वारस पूर्वीच दाव्यामध्ये ९ब ते ९फ प्रमाणे सामिल आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा हया दाव्यामध्ये सामिल करण्याची गरज नाही.

२. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.९अ या दिनांक २७/०४/२०१४ रोजी मयत झाल्या असून त्यांचा मृत्युचा दाखला निशाणी २५८ वर दाखल केला आहे. तसेच प्रस्तुत दाव्यामध्ये मयत प्रतिवादी क्र.९अ चे वारस हे ९ब ते ९फ प्रमाणे पूर्वीच सामिल आहेत. त्यामुळे प्रतिवादींनी मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सदर आदेशापासून १४ दिवसाचे आत दाव्यात दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

कराड.  
दि.१३/१०/२०२२.

( श्रीमती एस.वाय.देशमुख )  
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.